नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# दिनांक ०१/०२/२०२५ (शनिवार)संध्याकाळ

---

## खुन करणाऱ्या आरोपीला अटक

**पोस्टे कुही :—** पोलीस स्टेशन कुही अंतर्गत फिर्यादी ३१/०१/२५ रोजी सुंदरलाल मुन्नासिंग उईके,वय २६ वर्ष,रा.बांन्दा,पो.कलारबाकी,थाना बंडोर,ता.जि.शिवनी मध्यप्रदेश,ह.मु.महादेव वासे,मोहपा,ता.उमरेड,जि.नागपुर यांनी पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिली की त्यांचा अलताफ क्रेशर मशिन कंपनी चा जुना सुपरवॉयझर यांचा फोन आला कि तुझा वडील गांवडे क्रेशर कंपनी मोहपा जवळ रोड च्या बाजुला कच—या मध्ये मृत अवस्थेत पडून आहे.अश्या माहिती वरुन फिर्यादी घटनास्थळावर मौजा उंद्री शिवार गांवडे क्रेशर जवळ ता उमरेड येथे गेले तेव्हा त्यांना समजले की कोणीतरी अज्ञात कारणावरुन त्याच्या वडील मृतक मुन्नासिंग विश्वनाथ उईके,वय ५२ वर्ष,रा. बांन्दा,पो.कलारबाकी,थाना बंडोर,ता.जि.शिवनी मध्यप्रदेश,ह.मु.कादर खदान,उंन्द्री शिवार यांच्या डोक्यावर व चेह—यावर दगड मारुन हत्या केली अश्यफिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून पोस्टे कुही येथे कलम १०३ (१) भान्यास गुन्हा नोंद आहे.

मा. श्री हर्ष ए. पोद्‌दार पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामिण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात कुही पोलीस यांच्या सह स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रमीण यांनी सुध्दा समांतर तपास सुरू केला. स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रमीण यांचे पथक समांतर तपास करीत असतांना **तांत्रिक पुरावे तसेच गुप्तबातमीदार यांच्या मदतीने आरोपी जयदीप परसादी कुमर,३४ वर्षे,रा भरूटोला,ता.जि शिवणी यास ताब्यात घेऊन त्यास सखोल विचारपूस केली असता त्याने सांगितले की दिनांक ३०/० १/२०२५ रोजी दोघेही सोबत जात असताना त्यांच्यामध्ये झगडा भांडण झाल्याने व त्यामध्ये मृतकाने आरोपीस काठीने मारल्याने आरोपीने रागाच्या भरात मृतकास खाली ढकलून तिथे पडलेल्या दगडाने डोक्यावर मारून तेथून पळून गेलो अशी माहीती प्राप्त झाली. कुही पोलसांनी आरोपीस अटक केले असुन आरोपी दिनांक ०३/०२/२०२५ पर्यंत पि.सी.आर मध्ये आहे.**

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर